I.O.प्रत

(35)



# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District** (जिल्हा): बीड  **P.S.**(ठाणे): गेवराई  **Year** (वर्ष): 2019

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0178  **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 30/04/2019 17:15 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. **(a) Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): मंगलवार  **Date From** (दिनांक पासून): 30/04/2019

**Time Period** (कालावधी): पहर 4  **Date To** ( दिनांक पर्यंत): 30/04/2019

**Time From** (वेळेपासून): 10:31 बजे

**Time To** (वेळेपर्यंत): 10:31 बजे

**(b) Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 30/04/2019  **Time** (वेळ): 17:01 बजे

**(c) General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ

**Entry No.** (नोंद 029  **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 30/04/2019 17:01 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्तळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): दक्षिण, 20 किमी

**Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): मोहीमाता विद्यालय मादळमोही,गेवराई

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नांव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): महादेव बळीराम तळेकर

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती का नाव)

(c) **Date/Year of Birth** (जन्म 1971  (d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):  **Date of Issue** (अदा केल्याची तारीख):

**Place of Issue** (अदा केल्याची ठिकाण):

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मादळमोही ,तागेवराई जिबीड,गेवराई,बीड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मादळमोही ,तागेवराई जिबीड,गेवराई,बीड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-7887811446

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | महादेव वामन शिंदे | | | 1. मादळमोही,गेवराई जिबीड,गेवराई,बीड, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):**

फिर्याद दिनांक :- 30/04/2019. गेवराई ता.गेवराई जि.बीड.मी महादेव बळीराम तळेकर, वय 48 वर्षे, धंदा-नौकरी शिक्षक , मोहीमाता विद्यालय मादळमोही ता.गेवराई जि.बीड. रा.मादळमोही ता.गेवराई जि.बीड.मी दि.26/04/2019 रोजी अॅसीबी कार्यालय, बीड येथे श्री.हनपुडे पाटील, पोलीस उप अधीक्षक, अॅसीबी, बीड यांचेसमक्ष तक्रार दिली होती की, आमचे शाळेतील सर्व शिक्षकांचे 7वे वेतन आयोगाप्रमाणे वेतननिश्चीती झालेली आहे. वेतननिश्चीती झाल्यानंतर त्याची सेवापुस्तकाला नोंद होणे आवश्यक असते. त्यासाठी आमच्या सर्व शिक्षकांचे सेवापुस्तके हे लेखाधिकारी कार्यालय,बीड येथे पाठविण्यात आलेले आहेत. त्यानंतर आमचे शाळेचे मुख्याध्यापक श्री.महादेव शिंदे यांनी मागील आठ दिवसांपुर्वी आम्हाला सर्व शिक्षकांना बोलावुन मिटींग घेवुन सांगितले की, तुमचे सर्वांचे सेवापुस्तक वेतननिश्चीतीचे नोंद करण्यासाठी लेखाधिकारी कार्यालय,बीड येथे पाठविण्यात आलेले आहेत. त्यासाठी तुम्ही सर्व प्रत्येकी 1500/-रु.मला द्या. तुमच्या सर्वांच्या वेतननिश्चीतीची नोंद सेवापुस्तकाला करुन आणतो, असे म्हणुन शिंदे यांनी आम्हाला 1500/-रुपयांची मागणी केली. मिटींग झाल्यानंतर मी मुख्याध्यापक शिंदे यांना भेटुन 1500/-रु.जास्त होतात असे म्हणालो असता शिंदे यांनी मला लवकर 1500/-रु.आणुन दे नसता तुझ्या सेवापुस्तिकेत वेतननिश्चीतीची नोंद होऊ देणार नाही, असे म्हणुन माझ्याकडे 1500/-रुपयांची मागणी केली आहे, वगैरे मजकुराची तक्रार दिली होती.मी दिलेल्या तक्रारीवरुन दि.27/04/2019 रोजी पोलीस उपअधीक्षक श्री.हनपुडे पाटील यांनी मुख्याध्यापक शिंदे यांची माझ्याकडे लाचेची मागणी आहे किंवा कसे याबाबत मादळमोही येथे येऊन लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर सदर लाचमागणी पडताळणीचे अनुषंगाने मला व पंचाना योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर मला व पंच क्र.1 यांना माझे मोहीमाता विद्यालयात पाठवुन लाचमागणी पडताळणी करण्यात आली. लाचमागणी पडताळणीत शिंदे यांनी माझ्याकडे 7 वे वेतन आयोगाप्रमाणे झालेल्या वेतननिश्चीतीची लेखाधिकारी कार्यालय, बीड येथुन सेवापुस्तिकेत नोंद करुन आणण्यासाठी 1500/- रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम सोमवार दि.29/04/2019 रोजी स्वीकारण्याचे मान्य केले. त्यानंतर श्री.हनपुडे पाटील यांनी कळविले की, सोमवार दि.29/04/2019 रोजी शिंदे यांचे विरुध्द सापळा कारवाईचे आयोजन करण्यात येणार आहे. परंतु मी श्री.हनपुडे पाटील यांना मला सोमवारी महत्वाचे काम असल्याने मंगळवार दि. 30/04/2019 रोजी मुख्याध्यापक शिंदे यांचेविरुध्द सापळा कारवाई करण्याचे कळविले. त्यावरुन दि.30/04/2019 रोजी शिंदे यांचेविरुध्द सापळा कारवाईचे आयोजन करण्याचे ठरले. त्यावरुन आज दि.30/04/2019 रोजी सुरक्षित स्थळी मादळमोही येथे दोन शासकीय पंचांसमक्ष श्री.हनपुडे पाटील यांनी मला व दोन्ही पंचांना अँथ्रासीन पावडर व अल्ट्राव्हायलेट लम्प यांचा उपयोग व गुणधर्म सांगुन त्याचे प्रात्यक्षीक दाखवुन मी हजर केलेल्या 1500/-रु.लाच रकमेस अँथ्रासीन पावडर लावली व सदरची लाच रक्कम ही माझे पँटचे समोरील उजवे खिशात ठेवली. मला लाच स्वीकृतीनंतर करावयाचा ईशारा नेमुन दिला. वगैरे बाबींचा सापळापुर्व कारवाईचा पंचनामा करण्यात आला.सापळापुर्व कारवाईचा पंचनामा पुर्ण झाल्यानंतर मला व दोन्ही पंचांना व सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या. त्यानंतर व्हईस रेकर्डर चालु करुन

माझ्याकडे देऊन मला व पंच क्र.1 यांना घेऊन शिंदे यांची भेट घेण्यासाठी माझे मोहीमाता विद्यालयात रवाना करण्यात आले. आमचे पाठोपाठ सापळा पथक व पंच क्र.2 हे येत होते. मी व पंच क्र.1 असे दोघेही मोहीमाता विद्यालयाचे आवारात गेलो. तेथे गेल्यानंतर मुख्याध्यापक शिंदे हे त्यांचे कक्षाचे बाजुचे भिंतीलगत उभे दिसले. त्यानंतर मी व पंच क्र.1 असे मुख्याध्यापक शिंदे यांचे जवळ गेलो. त्यानंतर माझेत व मुख्याध्यापक शिंदे यांचेमध्ये चर्चा झाली. त्यानंतर शिंदे यांनी माझ्याकडे पैसे देण्याबाबत ईशारा केला उजवे हाताचा अंगठयाने ईशारा केला. त्यावेळी मी माझे उजवे हाताने पँटचे समोरील उजवे खिशातुन लाच रक्कम शिंदे यांना दिली असता शिंदे यांनी सदरची लाच रक्कम ही उजवे हाताने स्वीकारुन दोन्ही हातांनी मोजुन त्यांनी परिधान केलेल्या शर्टच्या छातीवरील डाव्या बाजुच्या वरच्या खिशात ठेवली. त्यावरुन मी कार्यालयाचे बाहेर येऊन मला शिंदे यांनी लाच स्विकारल्या बाबतचा नेमुन दिलेला पुर्व नियोजीत इशारा केला. इशारा प्राप्त होताच श्री.हनपुडे पाटील हे पंच क्र.2 व त्यांचे स्टाफसह कार्यालयात आले.माझ्याकडील व्हईस रेकर्डर बंद केला. तेव्हा श्री.हनपुडे पाटील यांनी शिंदे यांना त्यांची स्वत:ची, दोन्ही पंचांची व सापळा पथकाची ओळख करुन दिली. त्यानंतर श्री.हनपुडे पाटील यांनी पंच क्र.1 यांना पंच क्र.2 यांचेसमक्ष विचारणा केली की मला कोणी लाचेची मागणी केली व माझेकडुन कोणी लाच रक्कम स्वीकारली. तेव्हा पंच क्र.1 यांनी समोर उभ्या असलेल्या मुख्याध्यापक शिंदे यांच्याकडे बोट दाखवुन सांगितले की, शिंदे यांनी माझ्याकडे लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्वीकारली आहे. त्यानंतर श्री.हनपुडे पाटील यांनी शिंदे यांना लाच रक्कमबाबत विचारले असता शिंदे यांनी सदरची लाच रक्कम ही त्यांचे शर्टचे छातीवरील समोरील डावे खिशात ठेवल्याचे सं◌ागितले. त्यानंतर श्री.हनपुडे यांनी शिंदे यांचा परिचय करुन घेतला. शिंदे यांना पुर्ण नाव पत्ता विचारता त्यांनी महादेव वामन शिंदे, वय-58 वर्षे, मुख्याध्यापक, मोहिमाता विद्यालय, मादळमोही ता.गेवराई जि.बीड रा.मादळमोही ता.गेवराई जि.बीड असे सांगितले. त्यानंतर पंच क्र.2 यांनी पंच क्र.1 यांचे समक्ष शिंदे यांनी स्वीकारलेल्या लाच रकमेची मोजणी व पडताळणी केली असता सदरची लाच रक्कम ही सापळापुर्व कारवाईच्या पंचनाम्यामध्ये नमुद लाच नोटांचे वर्णन व क्रमांक सारखेच असल्याचे पंच क्र.2 यांनी कळविले.त्यानंतर पंच क्र.2 यांचे ताब्यातील लाचेच्या रकमेवर अंधार करुन अल्ट्राव्हायलेट दिव्याचा प्रकाश टाकला असता त्या नोटांवर अँथ्रासीन पावडरची हिरवट चकाकी दिसुन आली. त्यानंतर शिंदे यांनी लाच रक्कम ठेवलेल्या शर्टच्या खिशावर अल्ट्राव्हायलेटचा प्रकाश टाकला असता सदर खिशास अँथ्रासीन पावडरची हिरवट चकाकी दिसुन आली. त्यानंतर शिंदे यांचे दोन्ही हातांची अंधारात अल्ट्राव्हायलेट लम्पचे प्रकाशात माझे व पंचांसमक्ष तपासणी केली असता शिंदे यांचे दोन्ही हातांचे बोटाचे पेऱ्यावर व तळव्यावर ठिकठिकाणी अँथ्रासीन पावडरची हिरवट चकाकी दिसुन आली. त्यानंतर माझ्या हाताची व कपडयांची अंधारात अल्ट्राव्हायलेट लम्पचे प्रकाशात माझे पंचांसमक्ष तपासणी केली असता माझे उजवे हातावर व माझे पँटचे समोरील उजवे बाजुचे खिशाचे तोंडास व आतील बाजुस ठिकठिकाणी अँथ्रासीन पावडरची हिरवट चकाकी दिसुन आली. त्यानंतर मुख्याध्यापक शिंदे व माझी अंगझडती घेण्यात आली. त्यानंतर श्री.हनपुडे पाटील यांनी कळविले की, घटनास्थळी बध्यांची जास्त गर्दी झाल्याने पुढील कामकाज पोलीस स्टेशन गेवराई येथे करण्यात येणार आहे. त्यास दोन्ही पंचांनी संमती दिली. त्यावरुन घटनास्थळाचा नकाशा काढुन टिपण घेतले व त्यानंतर मी, दोन्ही पंच सापळा पथक , मुख्याध्यापक शिंदे असे सर्वजण पोलीस स्टेशन गेवराई येथे पोहचलो. तेथे आल्यानंतर श्री.हनपुडे पाटील यांनी पंच क्र.2 यांचे ताब्यातील लाच रक्कम 1500/-दोन्ही पंचांसमक्ष जप्त केली. त्यानंतर श्री.हनपुडे पाटील यांनी मला व पंच क्र.1 यांना हकिकत विचारली असता वरीलप्रमाणे हकिकत सांगितली. त्यानंतर व्हईस रेकर्डरमधील संभाषण माझे व दोन्ही पंचांसमक्ष ऐकुन त्यातील मेमरी कार्ड जप्त करण्यात आले. त्याबाबतचा सविस्तर घटनास्थळ पंचनामा करण्यात आलेला आहे.तरी मोहीमाता विद्यालय, मादळमोही येथील मुख्याध्यापक शिंदे यांनी यांनी माझ्याकडे 7 वे वेतन आयोगाप्रमाणे झालेल्या वेतननिश्चीतीची लेखाधिकारी कार्यालय, बीड येथुन सेवापुस्तिकेत नोंद करुन आणण्यासाठी माझ्याकडे दि.27/04/2019 रोजी 1500/-रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्वीकारण्याचे मान्य केले होते. त्यावरुन आज दि. 30/04/2019 रोजी मुख्याध्यापक शिंदे यांनी माझेकडुन 1500/-रु.लाच रक्कम मोहीमाता विद्यालय, मादळमोही येथे त्यांचे कक्षामध्ये शासकीय पंचांसमक्ष 10.31 वा.सुमारास स्वत: स्वीकारली असता लाचेच्या रकमेसह मुख्याध्यापक शिंदे यांना पोलीस उप अधीक्षक हनपुडे पाटील व त्यांच्या पथकाने लाचेच्या रकमेसह रंगेहात पकडले आहे. व लाच रक्कम 1500/-रु. पंचांसमक्ष शिंदे यांचेकडुन जप्त करण्यात आलेली आहे. तरी मोहीमाता विद्यालय, मादळमोही येथील मुख्याध्यापक शिंदे यांचेविरुध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे. समक्ष ( बाळकृष्ण हनपुडे पाटील ) पोलीस उप-अधीक्षकलाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे RAJARAM KASHINATH **Rank (पद):** SI (Sub-Inspector)

**No.(क्र.):** POBN79498 **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाम); BALASAHEB SADASHIV BADE
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PI